PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Jeevan ek sangharsh
Year: 2009

Song: Sangta hi yet nahi
Lyricist: Pravin Davane

सांगताही येत नाही
घाव हा हृदयातूनी
सांगताही येत नाही
घाव हा हृदयातूनी
विस्तवाची रेघ का रे
आपुल्या नात्यातूनी
सांगताही येत नाही
घाव हा हृदयातूनी

घास तो चिमण्या सुखाचा
ऊब ती मायेतली
कोण का उमजू शकेना
ओढ ती दोघातली
घास तो चिमण्या सुखाचा
ऊब ती मायेतली
कोण का उमजू शकेना
ओढ ती दोघातली
मी कुठेही पाहता रे
तूच दिसशी लोचनी
विस्तवाची रेघ का रे
आज ह्या नात्यातूनी
सांगताही येत नाही
घाव हा हृदयातूनी

ये पिला तू धाव घे रे
हात माझे मोकळे
पाय हे माझे तुला घे
अश्रू माझे पांगळे
ये पिला तू धाव घे रे
हात माझे मोकळे
पाय हे माझे तुला घे
अश्रू माझे पांगळे
ठायी ठायी भास होती
कोण तुझिया वाचूनी
विस्तवाची रेघ का रे
आज ह्या नात्यातूनी
सांगताही येत नाही
घाव हा हृदयातूनी

मी तुला जपले चिमुकल्या
अंतरी श्वासापरी
श्वास माझा दूर जाता
देह हा प्रेतापरी
मी तुला जपले चिमुकल्या
अंतरी श्वासापरी
श्वास माझा दूर जाता
देह हा प्रेतापरी
साद ऐकून येई सोन्या
प्रार्थना हृदयातूनी
विस्तवाची रेघ का रे
आज ह्या नात्यातूनी
सांगताही येत नाही
घाव हा हृदयातूनी
विस्तवाची रेघ का रे
आपुल्या नात्यातूनी
सांगताही येत नाही
घाव हा हृदयातूनी

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*